महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६१ वा | दिनांक : २९/११/२०२४ | वार : शुक्रवार

## एकनाथ शिंदे कदाचित उपमुख्यमंत्री होणार नाहीत आमदार शिरसाट यांचा दावा



**मुंबई :** महायुतीच्या नव्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची कोणतीही शक्यता नाही, असा दावा शिवसेनेचे प्रवक्ते तथा आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. कदाचित एकनाथ शिंदे महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार नाहीत. कारण, मुख्यमंत्री राहिलेल्या व्यक्तीने उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणे योग्य ठरणार नाही, असे ते म्हणालेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. पण निकाल लागून ४ दिवस लोटले तरी महायुतीला अद्याप आपले सरकार स्थापन करता आले नाही. यावरून वेगवेगळे तर्कवितर्क सुरू असताना काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकवर्तीय आमदार संजय शिरसाट यांनी नव्या मंत्रिमंडळात एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची शक्यता फार कमी असल्याचा दावा केला आहे.

एकनाथ शिंदे यांचा महायुतीच्या नव्या सरकारमध्ये समावेश होण्याची शक्यता आहे. पण ते कदाचित उपमुख्यमंत्री होणार नाहीत. मुख्यमंत्री पदावर असणाऱ्या व्यक्तीने पुन्हा उपमुख्यमंत्रीपदावर जाणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे शिवसेना एकनाथ शिंदे वगळता आपल्या अन्य एखाद्या नेत्याची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्याची सूचना करेल, असे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे महायुतीने यंदाची विधानसभा निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवली. त्यामुळे तेच महायुतीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार असतील असे मानले जात होते. पण प्रत्यक्ष विधानसभा निवडणुकीत भाजपच्या सर्वाधिक १३२ जागा आल्या. त्यामुळे भाजपने या पदावर दावा सांगण्यास सुरुवात केली आहे. यामुळे एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा होती. पण शिंदेंनी बुधवारी स्वतः पत्रकार परिषद घेत आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच आपला पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा घेतील त्या निर्णयाला पाठिंबा असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा केला जात आहे. यासंबंधी आज एखादा ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, नव्या मंत्रिमंडळात भाजप स्वतःकडे अर्ध्याहून अधिक खाती ठेवणार. तर शिवसेनेला ३ मोठ्या खात्यांसह १२ कॅबिनेट मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. त्यातुलनेत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ९ कॅबिनेट मंत्रिपदे मिळण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र मंत्रिमंडळात किमान ४३ मंत्री असू शकतात. त्यामुळे शिंदेंना शहर विकास, सार्वजनिक बांधकाम व जल संसाधनासारखे प्रमुख खाते मिळण्याची शक्यता आहे.

## हेमंत सोरेन चौथ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री



**रांची :** झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाचे नेते हेमंत सोरेन चौथ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. गुरुवारी रांची येथील मोरहाबादी मैदानावर राज्यपाल संतोष गंगवार यांनी त्यांना शपथ दिली. मंत्रिमंडळाचा विस्तार नंतर होणार आहे. या सोहळ्याला इंडिया आघाडीतील १० पक्षांचे १८ दिग्गज नेते उपस्थित होते. यामध्ये राहुल गांधी, पं. बंगालच्या ममता बॅनर्जी आणि सपा प्रमुख अखिलेश यादव आणि तेजस्वी यादव उपस्थित होते.

दुपारी ३ वाजता हेमंत सोरेन त्यांचे वडील शिबू सोरेन यांना हात धरून कार्यक्रमाच्या ठिकाणी घेऊन गेले. शपथ घेण्यापूर्वी हेमंत म्हणाले, 'आजचा दिवस ऐतिहासिक असेल. आपली एकता हेच आपले सर्वात मोठे शस्त्र आहे. आम्ही विभाजित किंवा संतुष्ट होऊ शकत नाही. आम्ही झारखंडी आहोत आणि झारखंडी झुकत नाहीत.

२३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निवडणूक निकालांमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा लीड इंडिया ब्लॉकने ८१ पैकी ५६ जागा जिंकल्या आहेत. यामध्ये झामुमोला ३४, काँग्रेसला १६, आरजेडीला ४ आणि एमएलकडे दोन जागा आहेत.

मंत्रिपदावरून काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू आहे. याच कारणामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार लांबणीवर पडला आहे. प्रदेश काँग्रेसचे प्रभारी गुलाम अहमद मीर यांनी दिव्य मराठीला सांगितले की, मंत्रिमंडळ विस्तार नंतर होईल.

## आंबेडकरांच्या 'वंचित'मुळे महायुतीचा २० जागांवर फायदा

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीमुळे महायुतीचा एक-दोन नव्हे, तर तब्बल २० जागांवर फायदा झाल्याचे समोर आले आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ आणि काँग्रेसचे ६ उमेदवार पडलेत.

विधानसभेत आलेल्या भाजपच्या आणि लाडक्या बहिणींच्या लाटेत मुस्लीम मतदार वंचितच्या पाठीमागे मोठ्या संख्येने उभा राहिल्याचे दिसून आले. याचा फटका मात्र महाविकास आघाडीला बसल्याचे दिसले.

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीमुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे फहाद अहमद, राजेंद्र शिंगणे, राहुल मोटे, राजेश टोपे, सतीश चव्हाण, संदीप नाईक यांना अगदी थोड्या मतांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तर काँग्रेसचे धीरज देशमुख, दिलीप सानंद, वसंत पुरके यांचाही अगदी कमी मतांनी विजय हुकला.

वंचित बहुजन आघाडीकडे दलित आणि मुस्लिमांची मते वळाली. त्यामुळे भाजपचे अतुल सावे, प्रशांत बंब, रमेश कराड, मंदा म्हात्रे, मेघना बोर्डीकर, आकाश फुंडकर हे अतिशय काटावर विजयी झाले. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे तानाजी सावंत आणि संजय गायकवाड यांच्या विजयातही वंचित बहुजन आघाडीने मते घेतल्याने हातभार लागला.

वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत २०० जागा लढवल्या. मात्र, त्यांच्या १९४ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार एका जागेवर दुसऱ्या तर ५८ जागांवर तिसऱ्या स्थानी राहिले. त्यांना १४ लाख २२ हजार म्हणजेच ३.१ टक्के मते मिळाली. तर मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला १५ लाख ८२ हजार म्हणजेच ३.६ टक्के मते मिळाली होती.

प्रकाश आंबेडकरांनी अल्पसंख्याक मतदार जास्त असणाऱ्या मतदारसंघात मुस्लीम उमेदवार दिले. त्यामुळे पूर्वाश्रमीचा मित्रपक्ष 'एमआयएम'ला जबर फटका बसला.

या पक्षाचे औरंगाबाद मध्य मतदारसंघातील उमेदवार इम्तियाज जलील आणि औरंगाबाद पूर्वचे उमेदवार सिद्दिकी नसुरीद्दीन तकुद्दीन यांना पराभवाचा सामना करावा लागला.

वंचित बहुजन आघाडीकडून प्रकाश आंबेडकरांनी राज्यात सर्वात अगोदर विधानसभा उमेदवारांची यादी जाहीर केली होती.

पहिल्या यादीमध्ये त्यांनी ११ उमेदवारांची नावे जाहीर केली होती. विशेष म्हणजे पक्षाने रावेर विधानसभा मतदारसंघात शमिभा पाटील या ट्रान्सजेंडर उमेदवाराला तिकीट दिले होते. वंचितच्या यादीत उमेदवारांच्या नावासह त्यांच्या जातीचाही उल्लेख केला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४


## जे. ई. एस. महाविद्यालयात संविधान दिना निमित्त विद्यार्थ्यांना शपथ



**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** : जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संविधान दिनानिमित्त विद्यार्थी-विद्यार्थिनींना भारतीय संविधानाची शपथ देण्यात आली.

आजच्या युवा पिढीमध्ये धर्मनिरपेक्षता, सामाजिक, आर्थिक, राजनीतिक न्याय विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, देशभक्ती, समता, बंधुता, राष्ट्रीय एकात्मता यासारख्या मूल्यांसाठी युवा पिढीला शपथ देणे आवश्यक आहे, हे या कार्यक्रमाचे मुख्य प्रयोजन असल्याचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. वसंत पवार यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, परिवेक्षिका प्रा. करुणा वासनिक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. वसंत पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र सोनवणे व प्रा. किशोर तापडिया, एनसीसी अधिकारी डॉ.फुलचंद मोहिते, प्रा. सतीश लोंढे, प्रा. प्रवीण वाघमारे, प्रा. अनिल घात्रे, विद्यार्थी - विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच यावेळी मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## मालेगावातील गुंडागर्दी व दादागिरी संपवा : आ. मुफ्ती मोहम्मद इस्माईल



**मालेगाव** : ज्यांना पराभव पचविता येत नाही त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरू नये. निकाल घोषित झाल्यापासून शहरात गुंडागर्दी व दादागिरी वाढली आहे. पोलिसांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावून २८ नोव्हेंबरपर्यंत गुंडागर्दी थांबवावी, अन्यथा शुक्रवारी (दि. २९) पुढील निर्णय घेऊ, असा इशारा आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल यांनी दिला आहे.

सरदार चौकात मंगळवारी (दि. २६) रात्री विजयी सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार मुफ्ती यांनी आक्रमकपणे विरोधकांसह पोलिसांवर सडकून टीका केली. छोटी मिरवणूक काढली तरीही आमच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जातात. तर दुसरीकडे मोठ्या मिरवणुका काढणाऱ्यांवर गुन्हे दाखल होत नाही, हा काय प्रकार सुरू आहे. तक्रार आलीच तर पोलिस गुन्हे नोंदविणार का? निवडणूक प्रचारासाठी कुठलाही जाहीरनामा प्रसिध्द केला नव्हता. चांगले व वाईट यांच्यात लढाई असल्याचा मुद्दा मांडून मते मागितली. दादागिरी व गुंडागर्दी संपविण्यासाठी आम्ही उभे आहोत. आता अन्याय सहन करणार नाही. जशास तसे उत्तर दिले जाईल. निकालानंतर आमच्या काही समर्थकांना मारहाण झाली. घरांमध्ये पेटते फटाके फेकण्यात आले. पोलिसांना हे प्रकार दिसत नाही की ऐकू येत नाही. पुन्हा दादागिरी व गुंडागर्दीचा प्रकार घडला तर घटनास्थळी दाखल होऊन उत्तर दिले जाईल. हा इशारा समजून पोलिसांनी नशेखोर, अमली पदार्थांची चोरटी विक्री करणारे, सट्टेबाज यांच्यावर कारवाई करून कायदा व सुव्यवस्था राखावी, असेही मुफ्ती यांनी स्पष्ट केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## मला मंत्री पदा पेक्षा जास्तीचा विकास निधी आणण्यात रस : आ. संजनाताई जाधव





**कन्नड (अरुण थोरात)**: तुझ्या तालुक्याला विकासनिधीची कुठलीही प्रकारची कमतरता येऊ देणार नाही. असा आशिर्वाद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलाय. मी सत्तेतील आमदार आहे. त्यामुळे तालुक्यातील विकासाचा अनुशेष भरुण काढणार असे प्रतिपादन कन्नड चे नवनिर्वाचित आमदार संजनाताई जाधव यांनी केले आहे.त्या दि.28 नोव्हेंबर रोजी कन्नड येथे आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होत्या.

त्या आपल्या भाषणात म्हणाल्या की, तालुक्यातील लाडक्या बहिणी व जनतेच्या आशिर्वादाने मी आमदार झालेय. निवडणुकीतील पंधरा दिवसांचा काळ माझ्या साठी सोपा नव्हता. मला मिळालेल्या गोष्टीत मी समाधानी आहे. आगामी पाच वर्षात असे काम करुण दाखविणार की ज्यांना माझे विचार पटत नसतील त्यांना ही ते पटतील. मागचा आणि आताचा काळ वेगळा आहे. माझ्या कडून चूका होतील ही, पण मला सर्वांनी सांभाळून घ्यावे. आपला तालुका हा सत्तेत बसलेला तालुका आहे. तालुक्यातील विकासाची मरगळ पाच वर्षात काढून टिकणार.

हात दाखवा गाडी थांबवा असा आमदार आपल्याला मिळालाय, तालुक्यातील गुजरदरी प्रकल्प, रस्ते, एमआयडीसी, आदी कामे मी पूर्ण करणार आहे. शिस्त आणून वळण लावणार आहे. असे सांगत त्यांनी आपला विकासाचे व्हिजन मांडले.

'गद्दारी करणाऱ्यावर फुली मारल्या जाईल, आमदार असतांना ज्यांना चिंता नव्हती त्यांना आता कामां बाबत चींता लागलीय, चींता करु नका तुमच्या कडून न झालेली कामे आम्हीच करणार आणि त्यासाठी आम्ही समक्ष असल्याचा टोला शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत यांनी आपल्या भाषणातून माजी आमदारांना लावला.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, डॉ संजय गव्हाणे, सेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख पुष्पाताई गव्हाणे, भाजप तालुकाध्यक्ष किशोर आबा पवार, उत्तमराव राठोड, अप्पाराव घुगे, पवन सोनावणे, देविदास जाधव यांची भाषणे झाली. सूत्रसंचालनक सुधाकर पवार यांनी केले.

याप्रसंगी बबनराव बनसोड, डॉ यशवंत पवार, रत्नाकर पंडित, सोनाली धाटबळे, हरिश थोरात, कैलास जाधव, शेखनाथ चव्हाण, दत्तू चव्हाण, काका कवडे, सुभाष काळे, गणेश घुगे, रमेश जाधव, प्रशांत अग्रवाल, ज्ञानेश्वर निकम, आदित्य गर्जे, विकास बागुल, रविंद्र चव्हाण, अमोल जाधव, आदींसह महायुती चे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४


# जेईएस महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेना दिन उत्साहात साजरा





***जालना, (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** "कामात्ते काहुरा"हे न्यूझीलंड येथील आदिवासी लोकांचे न्याय हक्कासाठी लढण्याचं प्रेरणादायी क्रांती गीत आहे , मला मृत्यूचा भय नाही ,मी माझ्या समाजा कल्याणासाठी लढतच राहील, पुढे हेच गीत न्यूझीलंडच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल टीमचे प्रेरणादायी गीत झाले असून जगभर याचा आज डंका वाजत आहे. असे प्रतिपादन जे ई एस महाविद्यालय जालना येथे आयोजित राष्ट्रीय छात्रसेना दिनाच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय छात्र सेना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. व्यासपीठावर राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन फुलचंद मोहिते कॅप्टन मोनिका काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ राजेंद्र सोनवणे तसेच विविध शाळेतील जालना जिल्ह्यातील राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एकता आणि अनुशासन प्रतीक असून, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आपण देशासाठी लढू शकतो, ही राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करते, हा कॅडेट इतरांपेक्षा वेगळा असतो. देशासाठी काहीतरी करण्याची तळमळ त्याच्यामध्ये असते. पुढे हेच विद्यार्थी सैन्य दलात वेगवेगळ्या तुकड्यांचे नेतृत्व करतात आणि देशाला अभिमानास्पद गौरव प्राप्त करून देतात.

यावेळी त्यांनी न्यूझीलँड मधील आदिवासी जमातीचे क्रांतीचे गीत"कामात्ये काहुरा"हे गीत गाऊन राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व प्रेरणा निर्माण केली, हे गीत पुढे न्युझीलँडच्या फुटबॉल टीमचे गीत कसे झाले हेही सांगितले.

देशासाठी लढणाऱ्या सैनिकाला कधीच मृत्यूचे भय नसते, तो देशासाठी सदैव लढतच असतो, हा आदर्श युवकांनी घ्यावा, असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी, राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे श्री. राजू केंद्रे, एम एस जैन मराठी विद्यालयाच्या श्रीमती इंदानी, व श्री अमोल मोहिते, पार्थ सैनिकी शाळेचे श्री.वाघुंडे, जेईएस महाविद्यालयाच्या महिला बटालियनच्या कॅप्टन मोनिका काळे,राष्ट्रीय छात्र सेना युनिट छत्रपती संभाजीनगरचे हवालदार श्री.प्रशांतकुमार, तसेच जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयातील छात्र सेनेचे कॅडेटस् मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीटीएमके विद्यालयाचे श्री पुष्कर सावंत यांनी, तर उपस्थितांचे आभार जेईएस महाविद्यालयाचे कॅप्टन डॉ.फुलचंद मोहिते यांनी व्यक्त केले.

# बोर्डापाठोपाठ आता सीईटी सेलचे परीक्षेचे वेळापत्रक जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** राज्य मंडळाने नुकतेच दहावी-बारावीच्या परीक्षेच्या निश्चित तारखा जाहिर केल्या आहेत. त्यापाठोपाठ सीईटी सेलनेदेखील १९ प्रकारच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार ९ ते २७ एप्रिल २०२५ दरम्यान एमएचटी-सीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. वेळापत्रक आधीच आल्याने विद्यार्थ्यांना आता अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी फायदा होणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत विविध पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा आयोजित केल्या जातात. त्यासाठी सीईटी सेलकडून १९ परीक्षा घेतल्या जातात.

या परीक्षांतील गुणांच्या आधारे केंद्रीय पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. इतर राज्यांच्या तुलनेत बोर्ड परीक्षांचे निकाल आणि सीईटीचे निकाल लांबल्यावर पुढील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना अडचण होत असते. परंतु आता आधीच वेळापत्रक जाहीर झाल्याने निकालही लवकर लागेल.

त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठीचा मार्गही मोकळा होईल, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. यामुळे आता या नव्या वेळापत्रकानुसार या परिक्षांचे आयोजन केले जाणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. सीईटीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केला. असे आहे वेळापत्रक - { शिक्षणशास्त्र पदवी - १६ मार्च { ३ वर्ष मुदतीच्या विधी अभ्यासक्रम सीईटी - २० ते २१ मार्च { एमसीए सीईटी २३ मार्च { बीएड (जनरल अँड स्पेशल) बीएड एलसीटी - २३ ते २५ मार्च { बी.डिझाइन - प्रवेश परीक्षा २९ मार्च { बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए सीईटी - १ ते ३ एप्रिल { नर्सिंग अभ्यासक्रमाची सीईटी ७ व ८ एप्रिलला { ९ ते १७ एप्रिल या कालावधीत पीसीबी तर १९ एप्रिल ते २७ एप्रिल या कालावधीत पीसीएम. ^यंदा दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करत त्या परीक्षा नेहमीपेक्षा दहा दिवस आधी घेतल्या जाणार आहेत.

त्यामुळे सीईटी सेलनेदेखील तसेच नियोजन करत परीक्षेचे वेळापत्रक आधीच जाहिर केले आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी होणार असून यामुळे परीक्षेचे अर्ज भरतानाही विद्यार्थ्यांना उपयोग होईल. आर.बी. गरुड, माजी उपप्राचार्य देवगिरी महाविद्यालय सीईटी सेलकडून १९ परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांतील गुणांच्या आधारे केंद्रीय पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक.






# जयभवानीच्या अभिषेक वारभूवनची रासेयो च्या आव्हान शिबिरासाठी निवड



**पाटोदा (प्रतिनिधी) :** येथिल कला व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक अभिषेक वारभुवन याची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती या ठिकाणी दिनांक ७ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित आव्हान २०२४ कुलपती ब्रिगेड (महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती दक्षता प्रशिक्षण कार्यक्रम) साठी निवड झाली होती.

या शिबिरामध्ये वेगवेगळ्या आपत्तीमध्ये कशाप्रकारे दक्षता घ्यावयाची आणि आपत्ती दूर करण्याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. या स्वयंसेवकाला राष्ट्रीय कार्यक्रमाधिकारी डॉ. बंडू लोखंडे, डॉ.शिवाजी काकडे यांनी मार्गदर्शन केले.

वारभुवन अभिषेक याने हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४

# मला पाडण्याची राणा दाम्पत्यांची औकात नाही : बच्चू कडू







**अमरावती** : विधानसभा निवडणुकीत बच्चू कडू यांचा अचलपूर मतदारसंघातून पराभव झाला. रवी राणा आणि नवनीत राणा दाम्पत्यांमुळे बच्चू कडू यांचा पराभव झाला, अशी चर्चा सध्या सुरू आहे. त्यावर बच्चू कडू यांनी उत्तर देत राणा दाम्पत्यांवर निशाणा साधला आहे. माझ्या पराभवाचे श्रेय त्यांनी घेऊ नये. मला पाडण्याची राणा दाम्पत्यांची औकात नाही, अशा शब्दांत बच्चू कडू यांनी सुनावले.

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यंदा महाशक्ती परिवर्तन आघाडीकडून विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात होते. अचलपूर मतदारसंघात त्यांचा पराभव झाला, तर दुसरीकडे त्यांचे कट्टर विरोधक रवी राणा हे बडनेरा मतदारसंघातून विजयी झाले आहेत. बच्चू कडू यांच्या पराभवाचे श्रेय त्यांचे विरोधक घेत आहेत. राणा दाम्पत्यामुळे बच्चू कडुंचा पराभव झाला, अशा चर्चा आहेत. यावरून बच्चू कडू यांनी प्रत्युत्तर दिले.

बच्चू कडू म्हणाले, राणा दाम्पत्यांनी माझ्या पराभवाचे श्रेय घेऊ नये. यंदाच्या निवडणुकीत चित्र वेगळे असते, अन् मी पडलो असतो, तर मग माझ्या पराभवाचे श्रेय त्यांना दिले असते. पण, सध्यातरी त्यांनी माझ्या पराभवाचे श्रेय घेऊ नये. बच्चू कडू को हमने गिराया असे ते म्हणतात. पण, मला पाडण्याची त्यांची औकात नाही, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला. त्यांच्यात हिंमत असेल, तर माझ्याविरोधात कुठलीही निवडणूक अपक्ष लढवून दाखवावी, असे आव्हानही बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्याला दिले.

विधानसभा निवडणुकीत अचलपूर मतदारसंघातून भाजपचे प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांचा १२ हजारांहून अधिक मतांनी पराभव केला. बच्चू कडू हे सलग ४ वेळा अचलपूर मतदारसंघातून निवडून आलेले आहेत. मात्र, यावेळी त्यांना पराभव स्वीकारावा लागला. दुसरीकडे बच्चू कडुंचे विरोधक आणि राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांचा बडनेरा मतदारसंघातून मोठा विजय झाला. रवी राणा यांना भाजपने पाठिंबा दिला होता. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या सुनील खराटे आणि प्रहार जनशक्ती पक्षाच्या प्रिती बंड यांचा पराभव केला.

# पंकजा विरोधी वक्तव्य केल्यामुळे पाथर्डीत धस यांचा पुतळा जाळला



**पाथर्डी** : पाथर्डी आष्टी मतदारसंघातून भाजपच्या तिकिटावर निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी विजयी सभेत माजी मंत्री, तथा आमदार पंकजा मुंडे यांनी आपल्या विरोधात काम केले. आपल्याला पाडण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचा थेट राजकीय आरोप केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

त्यांच्या निषेधार्थ मंगळवारी (26 नोव्हेंबर) पाथर्डी शहरात मुंडे समर्थकांनी आ. धस यांचा निषेध करीत त्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला. शहरातील नाईक चौकात धस यांचा पुतळा जाळून मुंडे समर्थकांकडून निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी मुकुंद गर्जे, धनंजय बडे, विजय आव्हाड, नितीन कीर्तने, माऊली खेडकर, उमेश खेडकर, राहुल खेडकर, हनुमान बडे, शिवनाथ खेडकर, पिणू मंचरे, रामहरी खेडकर आदी उपस्थित होते. आष्टी विधानसभा निवडणुकीत झालेल्या चौरंगी लढतीत आ. धस यांनी मोठा विजय मिळवला.

त्यानंतर निघालेल्या विजयी सभेत आ. धस म्हणाले, की 'तुम्ही कुणाच्या तरी सांगण्यावरून आम्हाला निवडणुकीत पाडण्यासाठी प्रयत्न केले. पंकजाताईंनी मला धोका द्यायला नको होता. माझ्याविरोधात काम करण्यास कार्यकर्त्यांना सांगितले. तुमच्या कार्यकर्त्यांनी शिट्टीचा प्रचार केला' असा आरोप केल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद उमटले. मुंडे समर्थकांनी आ. धस यांचा रविवारी सकाळी निषेध व्यक्त करून पुतळा जाळला.

यावेळी धनंजय बडे यांनी आ. धस यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत जाहीर निषेध केला. पंकजा मुंडे समर्थकांनी आ. धस यांचा पुतळा जाळून निषेध केला. ..तर ताकद कळली असती मुकुंद गर्जे म्हणाले, की आ. पंकजा मुंडे यांनी राज्यभर सभा घेऊन भाजप उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रामाणिक काम केले. त्याचे फलित म्हणून सर्व उमेदवार या निवडणुकीत निवडून आले. आष्टी मतदारसंघातही पंकजाताई यांनी धस यांच्यासाठी दोन सभा घेतल्या.

मात्र, आ. धस यांनी उपकाराची जाणीव न ठेवता निवडून आल्यानंतर आपला रंग बदलून निवडणुकीत मुंडे यांनी मदत नाही केली नाही, असे बेछूट आरोप पंकजाताईवर केले. असे वक्तव्य त्यांनी निवडणुकीच्या आधी केले असते, तर त्यांना मुंडे समर्थकांची ताकद कळली असती. आ. धस यांच्या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो.

# महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले : सदाभाऊ खोत



**माढा** : रयत क्रांती संघटनेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. जशा कुत्र्याच्या छत्र्या पावसाळ्यात येतात तशा छत्र्या आंदोलनाच्या येतील. महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले आहे, अशी खोचक टीका सदभाऊ खोत यांनी केली आहे.

सदाभाऊ खोत म्हणाले, मराठा समाजाला सर्वात जास्त कोणी दिले असेल तर ते भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिले असेल. मराठा समाजासाठी जे जे करता येईल ते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. जशा कुत्र्याच्या छत्र्या पावसाळ्यात येतात तशा छत्र्या आंदोलनाच्या येतात. तसेच महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले आहे, असे म्हणत शरद पवारांवर खोचक शब्दात टीका केली आहे.

पुढे बोलताना सदभाऊ खोत म्हणाले, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे नेते आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत. महाराष्ट्रातल्या राजकारणातला चाणक्य देवेंद्र फडणवीस आहेत. त्यांना केंद्रातील नेत्यांचा पाठिंबा आहे. प्रस्थापितांच्या बुडाला जाळ लावण्याचे काम देवा भाऊ यांनी केले आहे, असे म्हणत सदभाऊ खोत यांनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर टीका करताना सदभाऊ खोत म्हणाले, तंत्रज्ञान यायची सुरुवात झाली ती राजीव गांधी यांच्या काळामध्ये. ईव्हीएम हे सुद्धा कॉंग्रेसने आणले होते. आता तेच तंत्रज्ञानाला विरोध करत आहेत. तुम्हाला पुढची पिढी अडाणी ठेवायची आहे का? तुम्ही जिंकला की तुम्हाला चांगले वाटते आणि हरला की तुम्ही ईव्हीएमला दोष देतात.

पुढे बोलताना सदभाऊ खोत म्हणाले, या मशीनला बोलता येत नाही, चालता येत नाही म्हणून तुम्ही त्याला दोष देतात. महाविकास आघाडी ही सरदारांची आघाडी, जे सर्व्हे केलेत ते रस्त्यावरती लोकांचे सर्व्हे केले. मात्र घरातल्या माय माऊलींचा सर्व्हे केला नाही. कारण ते घरात जेवत नाहीत, बाहेर जेवतात, असा टोला सदभाऊ खोत यांनी नाना पटोले यांना लगावला आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव ईव्हीएमच्या विरोधात तीन दिवसीय उपोषण करणार आहेत. यावर सदाभाऊ खोत म्हणाले, बाबा आढाव यांनी या वयात आंदोलन करणे योग्य नाही आणि ते आंदोलन कोणासाठी करत आहेत, ज्यांनी महाराष्ट्र लुटला, देशाची राख रांगोळी यांनी केली, त्यांनी पिण्याचे पाणी दिले नाही, शेतीसाठी पाणी दिले नाही, त्यांच्यासाठी त्यांनी आंदोलन करू नये, असा सल्ला खोत यांनी दिला आहे.